दै. आदोहीर दि. 30.03.2021

# वाहतूक नियमांचे पालन करा

## वाहतूक शाखेकडून नांदेडकरांना आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी वाहनधारकांनी नियमांचे पालन करावे. वाहतूक शाखेच्या पोलिसांच्या इशाऱ्याकडे लक्ष द्यावे. वाहतूक विस्कळीत होईल, असे वाहने उभे करू नये, आदी सूचनांचे पालन वाहनधारकांनी करावे, आदी विषय घेऊन शहर वाहतूक शाखेच्या वतीने महात्मा फुले पुतळ्यासमोर शनिवारी जनजागृती करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जसपालसिंग कोटतिर्थवाले व एम. जी. एम. कॉलेज, नांदेड यांनी संयूक्तपणे जनजागृती करण्यात आली.

शहरातील आय. टी. आय. चौक, वजिराबाद चौक येथे नागरिकांनी व वाहनधारकांनी ट्राफिक सिग्नलचे नियम पाळणे, वाहन पार्कींगचे नियम व इतर मोटार वाहन कायदाचे नियम पाळणे, वाहन ओव्हर स्पीड चालविल्यास त्यांचे काय परिणाम होतात, दारू पिऊन वाहन चालविल्यास याचे काय दुष्परिणाम होतात, याबाबत सूचना व म ार्गदर्शन करून जनतेत मोटार वाहन कायदा व वाहन चालविताना पाळण्याचे नियम संबंधाने जनजागृती करण्यात आली.